# 'प्रेम सदा सर्वांशी करा '

( चाल- ज्योतसे ज्योत जलाते चलो )

बिली-

प्रेम सदा सर्वांशी करा, प्रेमध्वजा उंच हाती धरा
मार्गी दिसे, कधी कुणी तरुणी, प्रेमभावे तीज जवळी करा

काळ्या गो-या, पिवळ्या गव्हाळ्या, आवडती मज सगळ्या
उंच अन् बुटक्या, चटकचांदण्या, संतोषवती मजला
भेदभाव, कधी मनी न धरा, प्रेमध्वजा उंच हाती धरा
मार्गी दिसे कधी तरुणी........

गुलाबपाणि, हळूच शिंपूनी, फुलवीतो मी कळ्यांना
मदनबाण मृदू, कुशल मारूनी, सुखवीतो अनघांना
कामदेवाचे, स्मरण करा, प्रेमध्वजा उंच हाती धरा
मार्गी दिसे कधी कुणी तरुणी.........

विषय-वासना, गहन विषय अती, नाही कुणा कळलेला
शिष्या बना तुम्ही, माझ्या सगळ्या, शिकवीन तो मी तुम्हाला
वात्सायन, तुम्ही मनन करा, प्रेमध्वजा उंच हाती धरा
मार्गी दिसे कधी कुणी तरुणी.......

सुहास पै